| नवी मुंबई महानगरपालिका | | Navi Mumbai Municipal Corporation | |
|---|---|---|---|
| तिसरा मजला, प्लॉट नं.१, सेक्टर-१५ अे, सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४. | | 3rd floor, Plot No.1, Sector-15 A, C.B.D. Belapur, Navi Mumbai : 400 614. | |
| दुरध्वनी क्र. | २७५६७३६७ | Telephone No. : | 27567367 |
| | २७५६७३६८ | | 27567368 |
| फॅक्स : | २७५७३७८५ | Fax No. : | 27573785 |



वाचा :- 1. महाराष्ट्र शासन, आरोग्य विभाग, यांच्याकडील अधिसुचना दिनांक 14 मार्च 2020

जा.क्र.नमुंमपा/आरोग्य/ 2897 /2020

दि. 6 /05/2020

आदेश :-

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने साथरोग प्रतिबंधात्मक अधिनियम, 1897 मधील कलम 2, 3 व 4 अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून कोरोना विषाणूचा (कोव्हीड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने दिनांक 13/03/2020 रोजी अधिसूचना प्रसिध्द केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, सदर अधिसूचनेमधील नियम 10 अन्वये महापालिका आयुक्त यांना कोव्हीड-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, सिडको एक्झिबिशन सेंटर, से. 30 ए, वाशी या ठिकाणी 1200 बेडचे कोव्हीड केअर सेंटर सुरू करणे प्रस्तावित आहे. कोरोना बाधितांची सध्याची वाढती संख्या विचारात घेता सदर सेंटर तत्परतेने कार्यान्वित होण्याकरिता व सुयोग्य रितीने कार्यान्वित राहण्याकरिता वरिष्ठ अधिकारी यांची मुख्य नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती करणे गरजेचे आहे.

त्याअर्थी, मी अण्णासाहेब मिसाळ, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका मला प्राप्त झालेल्या उपरोक्त अधिसूचनेमधील नियम 10 अन्वये, सिडको एक्झिबिशन सेंटर येथील नियोजित कोव्हीड केअर सेंटर मधील संपूर्ण प्रशासकीय नियंत्रणाकरिता श्री. अमोल यादव, उपआयुक्त (महसूल), नवी मुंबई महानगरपालिका यांची प्रशासकीय नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती करीत आहे. संबंधितांनी सिडको महामंडळ तसेच नमुंमपाचे अभियांत्रिकी, आरोग्य, सुरक्षा. स्वच्छता अशा विविध विभागांशी समन्वय साधणे व कामकाजावर प्रशासकीय नियंत्रण ठेवणे तसेच विविध आवश्यक बाबींची पूर्तता सुनियोजित पध्दतीने होणेबाबत नियोजन करावयाचे असून त्या सेवांशी संबंधित विभागांचे प्रमुख यांच्याशी समन्वय राखून सुयोग्य अंमलबजावणी करावयाची आहे.

सिडको एक्झिबिशन सेंटर येथील कोव्हीड केअर सेंटर याठिकाणी विविध सेवा सुविधांची पूर्तता करण्यासाठी नेमणूक करण्यात येणारे सर्व अधिकारी, कर्मचारी हे प्रशासकीय नोडल ऑफिसर यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली काम पाहतील.

**(अण्णासाहेब मिसाळ)**
**आयुक्त**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**प्रति,**

श्री. अमोल यादव, उप आयुक्त (महसूल), नमुंमपा

प्रत:- माहितीस्तव व पुढील कार्यवाहीकरीता

1) अतिरिक्त आयुक्त (1/2), नवी मुंबई महानगरपालिका
2) उपआयुक्त (अतिक्रमण/परिमंडळ2), नवी मुंबई महानगरपालिका
3) वैद्यकिय आरोग्य अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका.

Scanned with CamScanner